आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६

ठळक बातम्या

1. **महिलांना निर्णय प्रक्रियेत समान प्रतिनिधित्व देणं काळाची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन.**
3. **महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर; १२ मे रोजी मतदान.**
4. **विदर्भात उष्णतेची लाट, नागरिकांनी काळजी घेण्याचा आपत्ती व्यवस्थापन विभागाचा सल्ला.**

नारी शक्ती वंदन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत नारी शक्ती वंदन अधिनियमाशी संबंधित विधेयकांवरील चर्चेदरम्यान महिलांना निर्णय प्रक्रियेत समान प्रतिनिधित्व देणे काळाची गरज असल्याचं सांगितलं. देशाच्या ५० टक्के लोकसंख्येचा धोरण निर्मितीत सहभाग आवश्यक असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी - ३८ सेकंद)

महिला आरक्षण विषयक विधेयकासाठी संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला आज प्रारंभ झाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'केंद्रशासित प्रदेश' (सुधारणा) विधेयक २०२६ प्रस्ताव लोकसभेत सादर केला. विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधानाची १३१ वी दुरुस्ती विधेयक तसंच, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडण्याचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला. यावेळी चर्चेत भाग घेतांना विरोधकांनी नारी शक्ती विधेयकाला राजकीय रंग देऊ नये, असं आवाहनही मोदी यांनी केलं. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी विधेयकाला पाठिंबा देत ते जनगणनेनंतर लागू करावे, अशी भूमिका मांडली. काँग्रेसचे गौरव गोगोई यांनीही महिला आरक्षणाला समर्थन देत तत्काळ अंमलबजावणीची मागणी केली. या विधेयकावरील चर्चा अद्याप सुरू आहे.

उद्धव ठाकरे

महिला आरक्षण विधेयक २०२३ साली संसदेत मंजूर झाले आहेच, त्यानुसार ३३ टक्के महिला आरक्षण तत्काळ लागू करा. मतदारसंघ पुनर्रचना म्हणजे डिलिमिटेशन या विषयाला तूर्त ब्रेक लागला पाहिजे, अशी मागणी शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. मतदारसंघ पुनर्रचना हा एक व्यापक, राष्ट्रीय एकात्मेसाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. आमच्यासाठी हा एखाद्या पक्षाच्या राजकीय भविष्याचा विषय नसून देशाच्या भविष्याचा विषय आहे. म्हणूनच त्यावर अधिक चर्चा आणि संशोधन होणे आवश्यक असल्याचं ठाकरे यांनी म्हंटल आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग

विद्यापीठ अनुदान आयोगानं देशभरातली विद्यापीठं आणि महाविद्यालयांमध्ये नारी शक्ती वंदन अधिनियमाबद्दल जनजागृती करणारे कार्यक्रम आयोजित केले आहेत. लिंगभाव समानता, संवैधानिक मूल्य तसंच निर्णय प्रक्रियेत महिलांना समान प्रतिनिधित्व या मुद्द्द्यांवर संवाद घडवून आणण्याच्या दृष्टीनं देशभरातल्या ७७७ शैक्षणिक संस्थांमध्ये आयोजित केलेल्या अशा कार्यक्रमांमध्ये सुमारे १ लाख जण सहभागी झाले होते.

दीक्षांत समारंभ राष्ट्रपति

वर्धा हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे वास्तव्य लाभलेला जिल्हा आहे. गांधीजींनी त्यावेळी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचे मोठे योगदान अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैयक्तिक प्रगतीसोबतच देशाला सशक्त, आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनविण्यासाठी योगदान द्यावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारंभात त्या मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर तसेच विश्वविद्यालयाच्या कुलपती प्राध्यापक कुमुद शर्मा उपस्थित होत्या. भारतीय भाषांचा अभिमान बाळगून त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, हे राष्ट्रपतींनी आवर्जून सांगितलं. जगातील कोणतीही भाषा शिका परंतू आपल्या भाषेला प्रथमस्थानी ठेवा असं आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केलं. -

(होल्ड बाईट - राष्ट्रपती - ३० सेकंद)

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदकं प्रदान करण्यात आली. एकूण आठ विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांत उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आलं. तत्पूर्वी आज सकाळी राष्ट्रपतींनी सेवाग्राम येथील बापू कुटीला देखील भेट दिली. या भेटीदरम्यान आपल्याला महात्मा गांधी यांचा साधेपणा, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेच्या कार्यातून प्रेरणा मिळाल्याचं त्यांनी सांगितलं.

श्याम स्टील उद्योग

चंद्रपूर जिल्ह्यातील गोडपिंपरी तालुक्यात श्याम स्टील उद्योग समूहाकडून सुमारे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून नवीन स्टील प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यात सुमारे ८ हजारांहून अधिक रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्य शासनाकडून उद्योग उभारणीसाठी आवश्यक सर्व सहकार्य दिलं जाणार असल्याचही त्यांनी स्पष्ट केलं.

विधानपरिषद

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार असल्याचं निवडणूक आयोगाने आज जाहीर केलं. त्यानुसार या निवडणुकीसाठी २३ ते ३० एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरता येतील. २ मे ला अर्जांची छाननी होईल, ४ मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि १२ मे ला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. विधानपरिषदेचे हे ९ सदस्य महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांकडून निवडले जाणार आहेत.येत्या १३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, संजय केनेकर, नागपूरचे आमदार संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि रणजीतसिंह मोहिते हे सदस्य निवृत्त होत आहेत.

उपवर्गीकरण/डॉ.नितीन राऊत

राज्य शासनाकडून अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणाबाबत सुरू असलेली प्रक्रिया पारदर्शक नसून, ती नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या विरोधात असल्याचा गंभीर आरोप माजी ऊर्जामंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून या प्रक्रियेला तात्काळ

स्थगिती देण्याची मागणी केली आहे. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक न करताच त्यावर केवळ ५ दिवसांत अभिप्राय मागवणे ही बाब संशयास्पद आहे. अहवालच माहित नसताना जनतेने आक्षेप कसे नोंदवायचे, असा सवाल डॉ.राऊत यांनी उपस्थित केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार, उप-वर्गीकरणासाठी ठोस 'वस्तुनिष्ठ आकडेवारी' अनिवार्य आहे. शासनाने अद्याप कोणतीही जातनिहाय शैक्षणिक किंवा नोकरीविषयक आकडेवारी जाहीर केलेली नाही. जर शासन उपवर्गीकरणावर ठाम असेल, तर ते केवळ नोकरीपुरते मर्यादित न ठेवता राजकीय क्षेत्र, उच्च शिक्षण, परदेश शिष्यवृत्ती आणि निमशासकीय संस्थांमध्येही लोकसंख्येच्या प्रमाणात लागू करावे, अशी आग्रही भूमिका डॉ. राऊत यांनी मांडली आहे.

बालविवाह

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी अमरावती जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने कारवाईचा इशारा दिला आहे. त्याचसोबत जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयातर्फे शहर, आणि ग्रामीण भागात जनजागृती मोहिम राबवली जात आहे. बालविवाह हा दखलपात्र गुन्हा आहे. अशा विवाहात सहभागी सर्व व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

पंकजा मुंडे

चंद्रपूर दौऱ्यावर आलेल्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्ह्यातील औद्योगिक प्रदूषणाबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. महामाया कोल वॉशरी परिसरात कोळशाची धूळ आणि काळा धूर पसरल्याचे प्रत्यक्ष पाहून त्यांनी चिंता व्यक्त केली . प्रदूषण नियंत्रणासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले आहेत. अन्यथा कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.

हवामान

आगामी 19 तारखेपर्यंत विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये उष्णतामानात वाढ होणार असल्याने नागरिकांनी स्वतःची काळजी घेण्याचं आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागानं केलं आहे. आज आणि उद्या अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला

आहे. उष्णतेपासून बचावासाठी नागरिकांनी भरपूर पाणी आणि ओआरएस घ्यावं, हलके आणि सैल कपडे वापरावेत तसंच बाहेर जाताना टोपी किंवा छत्रीचा वापर करावा, दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणं टाळावं, मद्यपान आणि कॅफिनयुक्त पेये टाळावीत, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. दरम्यान आज देखील अकोल्यात ४४ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आलं आहे. आज वर्धा इथं 44 अंश सेल्सिअस इतकं शुष्क तापमान नोंदवण्यात आलं. त्याचप्रमाणे अमरावती इथं 43 पूर्णांक 4 अंश, चंद्रपूर इथं 43, गडचिरोली येथे 42 पूर्णांक 6 अंश तर नागपुरात 42 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकं शुष्क तापमान नोंदविण्यात आलं आहे.